# मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे कार्यालय

## जाहीर निविदा

संदर्भ :– दिनांक 24 मार्च, 2024 च्या टिपणीवरील आदेश.

जिल्हा न्यायालयाचे आस्थापनांतर्गत कार्यरत बेलीफांना लेदर बॅग व रेनकोट खरेदी करुन पुरवठा करावयाचा आहे. त्याअनुषंगाने खर्चाचा आढावा घेण्याचे दृष्टीने लेदर बॅग व रेनकोट पुरवठा करण्यास इच्छुक असणाऱ्या पुरवठादार/दुकानदारांनी खालील अटी व शर्तीला अधिन राहून त्याबाबतची निवीदा, प्रत्येक वस्तुंचा प्रती नग दर सर्व करासहीत नमुद करुन सिलबंद लिफाफ्यात सादर कराव्यात असे जाहीर करण्यात येत आहे.

अटी व शर्ती :–

1. कार्यालयाने मागणी केल्यास लेदर बॅग व रेनकोटचा नमुना (Sample) सादर करणे आवश्यक राहील. तसेच सदर वस्तु ह्या जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे वाहतुक खर्चासह पुरवठा करणे बंधनकारक राहील.

2. सादर केलेल्या नमुण्यानुसारच (Sample) वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. पुरवठा केलेल्या वस्तूचे प्रतवारीत काही तफावत आढळून आल्यास पुरवठा करण्यात आलेल्या वस्तु परत करण्यात येईल व येणाऱ्या खर्चास पुरवठादार स्वतः जबाबदार राहील तसेच मागणी नोंदविल्यापासुन 15 दिवसांच्या आंत वस्तुचा पुरवठा करणे बंधन कारक राहील.

करीता इच्छुक पुरवठादारांनी उपरोक्त वस्तुंचा पुरवठा प्रति नग दर सर्व करासहीत नमुद करुन एका बंद लिफाफ्यात, ज्यावर “लेदर बॅग व रेनकोट ची निविदा” असे ठळक पणे नमुद करुन सदर निविदेचा लिफाफा मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे नावे जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे दिनांक 08/05/2024 चे कार्यालयीन वेळेपर्यंत पाहोचतील अशा बेताने पाठवावे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

आदेशान्वये,

25/4/24

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर

दिनांक :– 25/04/2024.